# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी -४ महाराष्ट्र विपीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनिम क्रमांक (६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (महाविद्यालयीन व विद्यापीठ विकास विभाग)

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली ४४२६०५

फोन /फॅक्स नंबर ०७१३२ - २२३१०४ Email-gug.registrar@gmail.com


गो.वि./मविविवि/ 1523 /२०२३ दिनांक: २२/ ०९/२०२३

## परिपत्रक

विषय :- महापरिनिर्वाण दिनानिमित्त राज्यस्तरीय वैचारिक अभिवादन प्रश्नोत्तरी परीक्षा व वक्तृत्व स्पर्धा आणि शोधनिबंध परीक्षेच्या आयोजनाबाबत.

संदर्भ :- डॉ.बाबासाहेब आंबेडकर नॅशनल असोशिएशन ऑफ इंजिनिअर्स यांचे पत्र क्र ९०/बानाई नागपूर/अभिवादन परीक्षा/२०२३ दि. २८/०८/२०२३

विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांना कळविण्यात येते की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर नॅशनल असोशिएशन ऑफ इंजिनिअर्स नागपूर या संस्थेनी मागील दहा वर्षापासुन विद्यार्थ्यांमध्ये दिवसेंदिवस कमी होत असलेली वाचनाची आवड वाढीस लागावी, संशोधनात्मक विवेचन आणि विश्लेषणाची रुची वाढून त्यांच्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या पुस्तकाची समिक्षा करण्याची पात्रता निर्माण व्हावी व त्यामाध्यमातुन भारतीय राज्यघटनेचे संवर्धन व्हावे यासाठी विविध उपक्रमांद्वारे प्रयत्न करित असतात. डॉ.बाबासाहेब आंबेडकर नॅशनल असोशिएशन ऑफ इंजिनिअर्स या संस्थेने महापरिनिर्वाण दिनानिमित्त दि. ०६ डिसेंबर, २०२३ रोजी राज्यस्तरीय वैचारिक अभिवादन प्रश्नोत्तरी परीक्षा व वक्तृत्व स्पर्धा आणि शोधनिबंध परीक्षेचे आयोजन करण्यात आलेले आहे.

त्याअनुषंगाने विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना संदर्भीय पत्राचे अवलोकन करून अवगत करावे तसेच जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना या परीक्षेत सहभागी होण्यासाठी प्रेरित करावे, हि विनंती.

सहपत्र : संदर्भीय पत्र

डॉ.अनिल हिरेखण
कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रति,

मा. प्राचार्य
सर्व संलग्नित महाविद्यालये
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रतिलिपी,

१) मा. कुलगुरु महोदय, यांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२) मा. प्र-कुलगरु यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.



# Dr. Babasaheb Ambedkar

## NATIONAL ASSOCIATION OF ENGINEERS

### NAGPUR - BRANCH

Registration No. M/S/BOM/455/G.B.B.S.D./Dated 1.8.1988 and Registration No. F 12721 Bombay
80 G F. No. CIT-I/Tech./80G/D32/2014-15 Date 03/06/2014

**Office :** Dr. Babasaheb Ambedkar Sanskrutik Bhavan, Uroovela Colony, Wardha Road, Nagpur-15.
**E-mail** : drbanae@gmail.com, **Website** : www.banae.ngp.com **Phone** : **2250208, 2250859**

**EXECUTIVE COMMITTEE**
**2023 - 2025**

**PRESIDENT**
Er. Arvind S. Gedam
Mob. : 9422111738

**VICE-PRESIDENT**
Er. Ajay R. Sawatkar
Mob. : 9422508050

**SECRETARY**
Er. Jayant A. Ingle
Mob. : 9423412317

**JOINT SECRETARY**
Er. Dhammanand R. Manwar
Mob. : 9730000843

**TREASURER**
Er. Anup J. Sangode
Mob. : 9423686121

**INTERNAL AUDITOR**
Er. Nilesh R. Nakhale
Mob. : 8600047671

**MEMBERS**
Er. Ajay D. Pohekar
Mob. : 9422567677

Er. Jyotsna W. Chavhan
Mob. : 9423634733

Er. Piyush G. Dhule
Mob. : 9823441734

**STATE EXECUTIVE COMMITTEE REPRESENTATIVE**
**Vice President**
Er. Bhaskar Khobragade
Mob. : 9029225337
**Organising Secretary**
Er. Rewatkumar Borkar
Mob. : 8007378756

Ref. No. ८८ / बानाई नागपूर / अभिवादन परीक्षा / २०२३ Date १९/०८/२०२३

प्रति,

मा. कुलगुरू,
गोंडवाना विद्यापीठ,
गडचिरोली.

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
कुलगुरूंचे कार्यालय
आवक क्र. 2915 दि. 02/9/23
जावक क्र. 3037 दि. 05/9/23

**विषय :-** महापरिनिर्वाण दिना निमित्त राज्यस्तरीय वैचारिक अभिवादन प्रश्नोत्तरी परीक्षा, व वक्तृत्व स्पर्धा आणि शोधनिबंध परीक्षेचे आयोजन करून आपले विद्यापीठ अधिनस्त महाविद्यालयातून जास्तीत जास्त विद्यार्थी सहभागी करून घेण्याबाबत...

**महोदय / महोदया,**

आपणास विदितच आहे की, आमची डॉ. बाबासाहेब आंबेडकर नॅशनल असोसिएशन ऑफ इंजिनिअर्स नागपूर ही संस्था मागील दहा वर्षांपासून विद्यार्थ्यांमध्ये दिवसेंदिवस कमी होत असलेली वाचनाची आवड वाढीस लागावी, संशोधनात्मक विवेचन आणि विश्लेषणाची रुची वाढून त्यांच्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या पुस्तकांची समीक्षा करण्याची पात्रता निर्माण व्हावी व त्या माध्यमातून भारतीय राज्यघटनेचे संवर्धन व्हावे यासाठी विविध उपक्रमांद्वारे प्रयत्न करीत आहे. विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परीक्षेला सामोरे जाण्याची पात्रता निर्माण होऊन एक जबाबदार नागरिक बनण्याच्या दृष्टीने त्यांची वाटचाल सुरू व्हावी यासाठी आमची संस्था सतत प्रयत्नशील आहे. या प्रक्रियेत वर्ष २०१३ पासून आम्ही सातत्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महापरिनिर्वाण दिनी त्यांच्यद्वारे लिखित साहित्यावर आधारित दरवर्षी ६ डिसेंबर रोजी राज्यस्तरीय वैचारिक अभिवादन प्रश्नोत्तरी परीक्षेचे आयोजन राज्यातील शाळा / महाविद्यालयांच्या माध्यमातून करीत आहोत.

याच शृंखलेत या वर्षी सुद्धा वस्तुनिष्ठ प्रश्नोत्तरी परीक्षा, वक्तृत्व स्पर्धा आणि शोध निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे.

प्रश्नोत्तरी परीक्षेचे स्वरूप :- **६ पुस्तकांवर आधारित वस्तुनिष्ठ ( Objective ) – १०० गुण**

| प्रवेश नोंदणी अंतिम तारीख २१ ऑक्टोंबर २०२३ | परीक्षा दिनांक: ६ डिसेंबर २०२३ | वेळ : ११:०० ते१२:०० |
|---|---|---|

- **" गट - अ " वर्ग ५ ते १२ मधील विद्यार्थी व " गट - ब " तंत्रनिकेतन, अभियांत्रिकी , पदवी, पदविका, पदव्युत्तर अभ्यासक्रमासह महाविद्यालयीन विद्यार्थी यांचा समावेश असेल .** ( सदर अट प्रश्नोत्तरी परीक्षा व वक्तृत्व स्पर्धा लागू असेल. )

<u>वक्तृत्व स्पर्धा</u> : व्हिडीओ पाठविण्याचा अंतिम दिनांक : ३१ ऑक्टोंबर २०२३ व्हिडीओ वेळ : ५ मिनिट

- वैचारिक अभिवादन परीक्षा आणि वक्तृत्व स्पर्धा यांचे प्रवेश शुल्क एकच राहणार असून दोन्ही परीक्षेकरिता गट – अ व गट - ब करिता शुल्क ५० रु./- राहील. ( अर्थात दोन्ही गटांचे सहभाग शुल्क फक्त ५०रु./- असेल. ) परंतु शोधनिबंध करिता परीक्षा शुल्क वेगळे राहील. ( १००रु./- )

<u>शोधनिबंध</u> परीक्षेचे शुल्क – १०० रु. /- शोधनिबंध गुण – ५० गुण

- शोधनिबंध पाठविण्याची अंतिम तारीख : ३१ ऑक्टोबर २०२३ पर्यंत पोस्टाने किंवा वेबसाईट https://www.banaengp.com/research-essay-form/ वर अपलोड करावे.

आवक क्र. 2213 दिनांक 5-9-23




**Office :** Dr. Babasaheb Ambedkar Sanskrutik Bhavan, Uroovela Colony, Wardha Road, Nagpur-15.
**E-mail** : drbanae@gmail.com, **Website** : www.banae.ngp.com **Phone** : 2250208, 2250859



**EXECUTIVE COMMITTEE**
**2023 - 2025**

**PRESIDENT**
Er. Arvind S. Gedam
Mob. : 9422111738

**VICE-PRESIDENT**
Er. Ajay R. Sawatkar
Mob. : 9422508050

**SECRETARY**
Er. Jayant A. Ingle
Mob. : 9423412317

**JOINT SECRETARY**
Er. Dhammanand R. Manwar
Mob. : 9730000843

**TREASURER**
Er. Anup J. Sangode
Mob. : 9423686121

**INTERNAL AUDITOR**
Er. Nilesh R. Nakhale
Mob. : 8600047671

**MEMBERS**
Er. Ajay D. Pohekar
Mob. : 9422567677

Er. Jyotsna W. Chavhan
Mob. : 9423634733

Er. Piyush G. Dhule
Mob. : 9823441734

**STATE EXECUTIVE COMMITTEE REPRESENTATIVE**
**Vice President**
Er. Bhaskar Khobragade
Mob. : 9029225337
**Organising Secretary**
Er. Rewatkumar Borkar
Mob. : 8007378756


Ref. No. Date

१) या परीक्षेतील प्राप्त गुणांच्या आधारे दरवर्षी ताकसांडे परिवार यांच्या तर्फे स्पर्धेतून प्राविण्य प्राप्त एक मुलगा व एक मुलगी यांची निवड करून विराज ताकसांडे स्मृती प्रित्यर्थ पदवी शिक्षण पूर्ण होई पर्यंत शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येते.

२) या तिन्ही परीक्षांना वेगवेगळी बक्षिसे देण्यात येतील.

३) या तिन्ही स्पर्धांच्या आयोजनात तन्मयतेने सहभागी होणाऱ्या शिक्षक / मुख्याध्यापक / समन्वयक व शाळा महाविद्यालयांना सुद्धा ऑनलाईन पद्धतीने कृतज्ञता प्रमाणपत्र प्रदान केले जाईल.

आपणास विनंती करण्यात येते की बुधवार दि.६ डिसेंबर २०२३ ला होणाऱ्या वैचारिक अभिवादन परीक्षेत तसेच वक्तृत्व आणि शोधनिबंध स्पर्धेत सहभागी होण्यासाठी आपल्या महाविद्यालयातील जास्तीत जास्त विद्यार्थी व आपले संपर्कातील इतरही शाळा / महाविद्यालयांना व त्यातील विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करावे. तसेच आपल्या शाळा / महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची यादी Excel Sheet Format मध्ये तयार करून बानाई चे E Mail - **drbanae@gmail.com** वर दिनांक <u>२१ ऑक्टोंबर २०२३ पर्यंत</u> व शोधनिबंध बानाई वेबसाईट https://www.banaengp.com/research-essay-form/ वर किवा पोस्टाने <u>दि.३१ ऑक्टोंबर २०२३</u> पाठविण्याची तसदी घ्यावी ही विनंती!

या परीक्षेचे परीक्षा शुल्क त्या महाविद्यालयाचे प्राचार्य यांचेकडे जमा करून चेक / डी. डी. बानाई **इंस्टिट्यूट ऑफ कॉम्पुटर एज्युकेशन नागपूर** चे नावे पाठवावे अथवा रोखीने अदा करावे. संपूर्ण रक्कम बानाई कार्यालयात किवा खाते **क्रमांक 10371309192 IFC कोड SBIN 000239** मध्ये जमा करावी. व **९०४९९०१८९२ / ८२०८९३९९५०** या मोबईल नंबर वर व्हाटसअप करावे. स्क्रीन शॉट किंवा डिपाझीट स्लीपवर महाविद्यालयाचे नाव व संपर्क क्रमांक यांचा उल्लेख असणे अनिवार्य राहील.

मागील परीक्षेत आपण मोठ्या प्रमाणावर विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करून परीक्षेमध्ये सहभागी केले याबद्दल आम्ही आपले मन:पूर्वक आभार मानतो व याही वर्षी आपल्या बहुमुल्य सहकार्याची अपेक्षा करतो.

<u>टिप :</u> १) कृपया आपल्या महाविद्यालयाच्या माहिती फलकावर हे पत्रक प्रसिद्ध करावे व परीक्षार्थी वाढीसाठी आपले स्तरावरून यथायोग्य नियोजन करावे ही विनंती.

२) अभिवादन प्रश्नोत्तरी आणि वक्तृत्व स्पर्धेची पुस्तके बाजारमूल्य ( छापील किंमत) च्या ४० % ते ५० % सुटीसह मिळवण्याकरिता **७०२००६०३४२ व ९८५०३३२२९६** या क्रमांकावर संपर्क साधता येईल परंतु आपल्या सोयीप्रमाणे इतरत्र ठिकाणावरून पुस्तके उपलब्ध करून घेण्याची मुभा असेल.

**<u>स्पर्धा / परीक्षा नियंत्रक :-</u>** बानाई कार्यकारिणी प्रतिनिधी इंजी. धम्मानंद मनवर ( ९७३००००८४३ ), इंजी. ज्योत्सना चव्हाण ( ९४२३६३४७३३ ) ,इंजी. अजय पोहेकर ( ९४२२५६७६७७ ) इंजी. पियुष धुळे ( ९८२३४४१७३४ ) तसेच प्रा. इंजी. महेंद्र राउत ( ९४२२८२१६२६ ), महा. राज्य उपाध्यक्ष इंजी. भास्कर खोब्रागडे ( ९०२९२२५३३७ ), इंजी. शरद घोडके ( ९८७४७७०७४७ ) आहेत. संपर्क करावे.

**आपला विनीत,**

**( इंजि. जयंत इंगळे )**
**सचिव बानाई**

सहपत्र :

**१) परीक्षेबद्दल सविस्तर माहिती सोबतच्या पत्रकात दिलेली आहे .**

# Dr. Babasaheb Ambedkar
## NATIONAL ASSOCIATION OF ENGINEERS
NAGPUR - BRANCH

Registration No. M/S/BOM/455/G.B.B.S.D./Dated 1.8.1988 and Registration No. F 12721 Bombay
80 G F. No. CIT-I/Tech./80G/D32/2014-15 Date 03/06/2014

**Office :** Dr. Babasaheb Ambedkar Sanskrutik Bhavan, Uroovela Colony, Wardha Road, Nagpur-15.
**E-mail** : drbanae@gmail.com, **Website** : www.banae.ngp.com **Phone** : 2250208, 2250859



**EXECUTIVE COMMITTEE**
**2023 - 2025**

PRESIDENT
Er. Arvind S. Gedam
Mob. : 9422111738

VICE-PRESIDENT
Er. Ajay R. Sawatkar
Mob. : 9422508050

SECRETARY
Er. Jayant A. Ingle
Mob. : 9423412317

JOINT SECRETARY
Er. Dhammanand R. Manwar
Mob. : 9730000843

TREASURER
Er. Anup J. Sangode
Mob. : 9423686121

INTERNAL AUDITOR
Er. Nilesh R. Nakhale
Mob. : 8600047671

MEMBERS
Er. Ajay D. Pohekar
Mob. : 9422567677

Er. Jyotsna W. Chavhan
Mob. : 9423634733

Er. Piyush G. Dhule
Mob. : 9823441734

STATE EXECUTIVE COMMITTEE
REPRESENTATIVE
Vice President
Er. Bhaskar Khobragade
Mob. : 9029225337
Organising Secretary
Er. Rewatkumar Borkar
Mob. : 8007378756


Ref. No. ९०/बानाई नागपूर / अभिवादन परीक्षा / २०२३ Date २८/०८/२०२३


गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभाग
आवक क्र. 2272 दिनांक 12-9.23
जावक क्र.......... दिनांक..........


प्रति,

मा. कुलगुरू,
गोंडवाना विद्यापीठ,
गडचिरोली.

**विषय :- महापरिनिर्वाण दिना निमित्त राज्यस्तरीय वैचारिक अभिवादन प्रश्नोत्तरी परीक्षा, व वक्तृत्व स्पर्धा आणि शोधनिबंध परीक्षेचे आयोजन करून आपले विद्यापीठाचे अधिनस्त महाविद्यालयातून जास्तीत जास्त विद्यार्थी सहभागी करून घेण्याबाबत...**

महोदय,

आपणास विदित आहे की, आमची डॉ. बाबासाहेब आंबेडकर नॅशनल असोसिएशन ऑफ इंजिनिअर्स नागपूर ही संस्था मागील दहा वर्षांपासून विद्यार्थ्यांमध्ये दिवसेंदिवस कमी होत असलेली वाचनाची आवड वाढीस लागावी, संशोधनात्मक विवेचन आणि विश्लेषणाची रुची वाढून त्यांच्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या पुस्तकांची समीक्षा करण्याची पात्रता निर्माण व्हावी व त्या माध्यमातून भारतीय राज्यघटनेचे संवर्धन व्हावे यासाठी विविध उपक्रमांद्वारे प्रयत्न करीत आहे. विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परीक्षेला सामोरे जाण्याची पात्रता निर्माण होऊन एक जबाबदार नागरिक बनण्याच्या दृष्टीने त्यांची वाटचाल सुरू व्हावी यासाठी आमची संस्था सतत प्रयत्नशील आहे. या प्रक्रियेत वर्ष २०१३ पासून आम्ही सातत्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महापरिनिर्वाण दिनी त्यांच्याद्वारे लिखित साहित्यावर आधारित दरवर्षी ६ डिसेंबर रोजी राज्यस्तरीय वैचारिक अभिवादन प्रश्नोत्तरी परीक्षेचे आयोजन राज्यातील शाळा / महाविद्यालयांच्या माध्यमातून करीत आहोत.

**याच शृंखलेत यावर्षीसुद्धा वस्तुनिष्ठ परीक्षा, वक्तृत्व स्पर्धा आणि शोधनिबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे.**

ही संस्था विद्यार्थ्यांमध्ये उपरोक्त उद्दिष्टे रुजविण्यासोबतच इतरही अनेक सामाजिक कार्यात अग्रेसर आहे. व त्यासाठी २०१९ ला **महाराष्ट्र शासनाचा शाहू - फुले - आंबेडकर पुरस्कार या संस्थेला प्राप्त झाला आहे.** ही आमच्या संस्थेसाठी प्रेरणा देणारी बाब आहे. व त्या प्रेरणेतूनच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. व या वर्षीही जास्तीत जास्त विद्यार्थी ह्या परीक्षेसाठी सहभागी व्हावेत हा आमचा मानस आहे.

DR, College & Development section
11/09/23

12/9/23

# Dr. Babasaheb Ambedkar

## NATIONAL ASSOCIATION OF ENGINEERS

NAGPUR - BRANCH

Registration No. M/S/BOM/455/G.B.B.S.D./Dated 1.8.1988 and Registration No. F 12721 Bombay
80 G F. No. CIT-I/Tech./80G/D32/2014-15 Date 03/06/2014

**Office :** Dr. Babasaheb Ambedkar Sanskrutik Bhavan, Uroovela Colony, Wardha Road, Nagpur-15.
**E-mail** : drbanae@gmail.com, **Website** : www.banae.ngp.com **Phone** : 2250208, 2250859





**EXECUTIVE COMMITTEE 2023 - 2025**

PRESIDENT
Er. Arvind S. Gedam
Mob. : 9422111738

VICE-PRESIDENT
Er. Ajay R. Sawatkar
Mob. : 9422508050

SECRETARY
Er. Jayant A. Ingle
Mob. : 9423412317

JOINT SECRETARY
Er. Dhammanand R. Manwar
Mob. : 9730000843

TREASURER
Er. Anup J. Sangode
Mob. : 9423686121

INTERNAL AUDITOR
Er. Nilesh R. Nakhale
Mob. : 8600047671

MEMBERS
Er. Ajay D. Pohekar
Mob. : 9422567677

Er. Jyotsna W. Chavhan
Mob. : 9423634733

Er. Piyush G. Dhule
Mob. : 9823441734

STATE EXECUTIVE COMMITTEE REPRESENTATIVE
Vice President
Er. Bhaskar Khobragade
Mob. : 9029225337
Organising Secretary
Er. Rewatkumar Borkar
Mob. : 8007378756


Ref. No. Date

आपणास विनंती करण्यात येते की बुधवार दि . ६ डिसेंबर २०२३ ला होणाऱ्या वैचारिक अभिवादन परीक्षेत तसेच वक्तृत्व आणि शोधनिबंध स्पर्धेत सहभागी होण्यासाठी आपले विद्यापीठाचे अधिनस्त महाविद्यालयातून सहभागी होण्यासाठी आपल्या स्तरावरून निर्देश द्यावे ही विनंती.

**मागील वर्षी आपल्या स्तरावरून औद्योगिक प्रशिक्षण संस्थाना निर्देशित करून परीक्षेमध्ये सहभागी केले याबद्दल आम्ही आपले मन:पूर्वक आभार मानतो व याही वर्षी आपल्या बहुमुल्य सहकार्याची अपेक्षा करतो.**

आपला स्नेहांकित,

( इंजी. जयंत इंगळे )
सचिव

सहपत्र : परीक्षेचे माहितीपत्रक


प्रतिलिपी,

१) **प्राचार्य ........................................ चंद्रपूर, गडचिरोली**

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर

## नॅशनल असोसिएशन ऑफ इंजिनिअर्स शाखा नागपूर

पत्ता : डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन, उरुवेला कॉलनी, वर्धा रोड, नागपूर-१५
E-mail : drbanae@gmail.com, Website : www.banaengp.com PhoneNo: 0712-2250208, 2250859



द्वारा आयोजित

# राज्यस्तरीय 'वैचारिक अभिवादन' प्रश्नोत्तरी स्पर्धा परीक्षा-२०२३

**प्रवेश नोंदणी अंतिम तारीख २१/१०/२०२३** | **परिक्षा दि. ६/१२/२०२३** | **वेळ : सकाळी ११ ते १२**

**एकुण आकर्षक बक्षिसे 1,59,000/-**

## पारितोषिके

| | | | |
|---|---|---|---|
| अ गट बक्षिसे | प्रथम-१०,०००/- | द्वितीय-७,०००/- | तृतिय-५,०००/- |
| ब गट बक्षिसे | प्रथम-१०,०००/- | द्वितीय-७,०००/- | तृतिय-५,०००/- |




प्रोत्साहनपर बक्षिसे :- १५०० रु./- प्रमाणे प्रत्येकी पाच बक्षिसे ( अ आणि ब गटाकरिता )

### : स्पर्धा परीक्षा अभ्यासक्रम :

१) बुद्ध आणि त्यांचा धम्म (केवळ खंड - १ आणि खंड ५)
२) राज्य आणि अल्पसंख्यांक
३) बुद्ध की कार्ल मार्क्स
४) क्रांती आणि प्रतिक्रांती
५) जाती निर्मुलन
६) संविधान निवडक अनुच्छेद १ ते ५१ (पुस्तिका)

### परीक्षेचे स्वरूप

**वरील पुस्तकांवर आधारित वस्तुनिष्ठ परीक्षा - १०० गुण वेळ : १:०० तास**

| गट अ | परीक्षा शुल्क | गट ब | परीक्षा शुल्क |
|---|---|---|---|
| वर्ग ५ ते १२ | ५० रुपये /- | तंत्रनिकेतन, अभियांत्रिकी, पदवी, पदविका, पदव्युत्तर अभ्यासक्रमासह महविद्यालयीन विद्यार्थी | ५० रुपये/- |

# वक्तृत्व स्पर्धा

| | | | |
|---|---|---|---|
| अ गट बक्षिसे | प्रथम-१०,०००/- | द्वितीय-५,०००/- | तृतिय-३,०००/- |
| ब गट बक्षिसे | प्रथम-१०,०००/- | द्वितीय-५,०००/- | तृतिय-३,०००/- |

**प्रोत्साहनपर बक्षिसे :- १००० रु./- प्रमाणे प्रत्येकी पाच बक्षिसे ( अ आणि ब गटाकरिता )**

विषय :- १) बुद्ध आणि त्याचा धम्म या ग्रंथाचे आपल्या जीवनात स्थान.
२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय लोकशाही
३) "बहिष्कृत भारत" यात प्रकाशित महाड क्रांती आणि सवर्ण हिंदू इंग्रज सरकार अस्पृश्य संबंधी तीन अग्रलेखाचे तसेच संविधान सभेतील पहिले व शेवटचे आणि पुणे लॉ कॉलेज लायब्ररीतील 'लोकशाहीच्या यशस्वीतेच्या पुर्वावर्ती अटी' या भाषणांचे नवभारत निर्मितीमध्ये योगदान.
(विषय क्र. ३ हा केवळ पदवी पदविका पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे विद्यार्थ्यांसाठी असून इतर तिन्ही विषयांवर गट अ चे विद्यार्थी सुद्धा वक्तृत्व करू शकतील.)

अभ्यासक्रम :- १) **तीन अग्रलेख आणि तीन भाषणे यांची पुस्तिका**
अ) महाड मुक्ती संगर आणि स्पृश्य हिंदूंची जवाबदारी
ब) महाड मुक्ती संगर आणि अस्पृश्यांची कर्तव्ये
क) महाड मुक्ती संगर आणि इंग्रज सरकारची जवाबदारी
ड) संविधान सभेतील पहिले भाषण ९ डिसेंबर १९४६
इ) दि. २२- १२- १९५२ चे पुणे लॉ कॉलेज ग्रंथालयातील भाषण लोकशाहीच्या यशस्वी ते पूर्वर्ती शर्ती (भाग - ३ पान ३२५ खंड १८)
ई) संविधान सभेतील शेवटचे भाषण २५ नोव्हेंबर १९४९

**परीक्षेचे स्वरूप :- वक्तृत्व स्पर्धा - ५० गुण वेळ : ५ मिनिट**

# शोध निबंध

शोधनिबंधासाठी बक्षिसे :-

| | | | |
|---|---|---|---|
| विषय १ | प्रथम-१०,०००/- | द्वितीय-५,०००/- | तृतिय-३,०००/- |
| विषय २ | प्रथम-१०,०००/- | द्वितीय-५,०००/- | तृतिय-३,०००/- |
| विषय ३ | प्रथम-१०,०००/- | द्वितीय-५,०००/- | तृतिय-३,०००/- |

परीक्षेचे स्वरूप - परीक्षा शुल्क रु. १००/-
शोधनिबंध लेखन परीक्षा - ५० गुण

शोधनिबंध विषय :-
१)डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची नवभारत निर्मितीची संकल्पना व त्या संकल्पपूर्ती करिता माझी जबाबदारी व भूमिका
२)द्वितीय महायुद्धात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भारतीय स्वातंत्र्याबाबतची दूरदृष्टी.
३)भारताचे कृषी अर्थशास्त्र आणि बाबासाहेबांची भूमिका

## अभिवादन परिक्षेच्या नियम व अटी

Merchant Name : BANAE INSTITUTE OF COMUTE
UPI ID : banae@sbi

१) ही परीक्षा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अभिवादनार्थ असल्याने उपरोक्त पुस्तके सखोलपणे अभ्यासणे अपेक्षित आहे.
२) ही परीक्षा शाळा महाविद्यालयातूनच आयोजित केल्या जाईल.
३) स्पर्धेचे माध्यम मराठी, हिंदी, व इंग्रजी राहील .
४) शाळा महाविद्यालयांना प्रश्नसंच व उत्तरपत्रिका बानाई नागपूर तर्फे पुरविण्यात येतील.
५) सर्व विद्यार्थ्यांची यादी Excel Sheet दिलेल्या Format मध्ये शाळा महाविद्यालया मार्फत कार्यालयात वा Email- drbanae@gmail.com या संकेतस्थळी पाठविणे आवश्यक आहे.
६) या तिन्ही परिक्षांचे परिक्षा शुल्क त्या शाळा महाविद्यालयाचे मुख्यध्यापक, प्राचार्य, यांचेकडे जमा करून चेक/डी.डी. बानाई इंस्टिट्युट ऑफ कॉम्प्युटर एज्युकेशन नागपूर चे नावे पाठवावे अथवा रोखीने अदा करावे. संपूर्ण रक्कम बानाई कार्यालयात किंवा खाते क्रमांक 10371309192 IFC CODE SBIN000239 मध्ये किंवा वर दिलेल्या QR Code स्कॅन करावे व 9049901892/ 8208939950 या मोबाईल नंबर वर व्हाटसअप करावे स्क्रीन शॉट किंवा डिपाझीट स्लीपवर शाळा महाविद्यालयाचे नाव व संपर्क क्रमांक यांचा उल्लेख असने अनिवार्य राहील.
७) परीक्षेत सहभागी विद्यार्थ्यांना online पद्धतीने सहभाग प्रमाणपत्र देण्यात येईल.
८) पुस्तकांवर आधारित वस्तुनिष्ठ ( objective ) परीक्षा ही शाळा महाविद्यालयातून शिक्षक / मुख्यध्यापक यांचे देखरेखीखाली घेण्यात येईल.
९) सदर परीक्षा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अभिवादनार्थ असल्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतीमेला अभिवादन करून दि. ६ डिसेंबर २०२३ बुधवार रोजी वेळ सकाळी ११: ०० ते १२:०० वाजेपर्यंत, ज्या जिल्ह्यात जे परीक्षा केंद्र निवडले जातील त्या केंद्रामधून घेण्यात येईल. परीक्षा केंद्रामध्ये बदल करण्याचे संपूर्ण अधिकार बानाई नागपूर चे असतील.
१०) वैचारिक अभिवादन परिक्षा आणि वक्तृत्व स्पर्धा यांचे प्रवेश शुल्क एकच असेल.
११) प्रवेश घेण्याची अंतिम तारीख २१ ऑक्टोबर २०२३ राहील.
१२) प्रश्नोत्तरी परिक्षा, वक्तृत्व स्पर्धा या दोन्ही परिक्षांना वेगवेगळी बक्षीसे देण्यात येतील
१२) बक्षिसांची रक्कम विजेत्या स्पर्धकांना A/C pay चेकनेच दिली जाईल.
१३) प्रश्नोत्तरी आणि वक्तृत्व स्पर्धा संबंधित शाळा / महाविद्यालयाचे प्राचार्य / मुख्यध्यापक / शिक्षक / प्राध्यापक यांचे देखरेखी खाली घेण्यात येईल.
१४) प्रश्नोत्तरी परीक्षा - १०० गुण, व वक्तृत्व स्पर्धा - ५० गुण, अश्या स्वरुपाची असेल.
१५) सहभागी शाळा / महाविद्यालय तसेच शिक्षक / मुख्याध्यापक / प्राध्यापक / समन्वयक यांना online कृतज्ञता प्रमाणपत्र देण्यात येईल.
१६) अभिवादन प्रश्नोत्तरी आणि वक्तृत्व स्पर्धेची पुस्तके बाजारमूल्य ( छापील किंमत ) च्या ४० % ते ५० % सुटीसह मिळवण्याकरिता 7020060342 व 9850332296 या क्रमांकावर संपर्क साधता येईल परंतु आपल्या सोयीप्रमाणे इतरत्र ठिकाणावरून पुस्तके उपलब्ध करून घेण्याची मुभा असेल.

## वक्तृत्व स्पर्धेच्या नियम व अटी

१) वक्तृत्व स्पर्धेमध्ये अ व ब असे दोन गट असून अ गटामध्ये वर्ग ५ ते १२ पर्यंतच्या विद्यार्थ्यांचा समावेश असेल. ब गटामध्ये पदवी पदविका व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांचा समावेश असेल. दोन्ही गटांना वेग वेगळी आकर्षक बक्षिसे देण्यात येतील.
२) ब गटातील शाळा बाह्य परीक्षार्थीना सहभाग घ्यावयाचा झाल्यास त्यांनी आपले जवळची शाळा/ महाविद्यालयाशी संपर्क करावा. त्यांचा आक्षेप नसल्यावरच आपणास परीक्षेत बसता येईल. शाळा बाह्य विद्यार्थ्यांस शाळा महाविद्यालयांनी परीक्षेला बसू देण्याची अनुमती देऊन प्रवेश व परीक्षा प्रक्रिया पूर्ण करावी व सर्वच विद्यार्थ्यांची यादी Excel -Sheet मध्ये बानाई कार्यालयात वा E-Mail - drbanae@gmail.com संकेत स्थळी पाठविणे अनिवार्य आहे.
३) शाळा / महाविद्यालयातून सर्व सहभागी स्पर्धकांपैकी पहिल्या दोन उत्कृष्ठ स्पर्धकांची निवड करून त्यांचे वक्तृत्वाचा व्हीडिओ पेन ड्राईव्ह मध्ये सेव्ह करून पोस्टाने अथवा प्रत्यक्ष बानाई कार्यालयात ३१ ऑक्टोम्बर २०२३ पर्यंत पाठविण्याची व्यवस्था करावी.
४) निवडलेल्या दोन विद्यार्थ्यांचा व्हीडिओ ५ मिनिटांचा असावा.
५) व्हीडिओ हा स्पष्ठ असावा. त्यामध्ये इतरत्र दुसरा कोणताही आवाज नसावा. एडीट केलेला व्हीडिओचा स्पर्धेकरिता विचार केला जाणार नाही.
६) प्रत्येक स्पर्धकाला ५ मिनिटांचा वेळ देण्यात यावा दोन्ही व्हीडिओ पूर्वी स्पर्धकाचे नाव पत्ता व शाळा महाविद्यालयाचे नाव असावे व वक्तृत्व स्पर्धेचा आयोजन दिनांक असावा.
७) आपल्या शाळेतील सर्व स्पर्धकांमधून केवळ दोन स्पर्धकांची निवड करून फक्त त्यांचेच व्हीडिओ बानाईकडे पेन ड्राईव्ह मध्ये पाठवावे.
८) शाळा महाविद्यालयांनी ही स्पर्धा आपल्या शाळा महाविद्यालयाच्या परिसरात आयोजित करावी. जेणेकरून बहुतांश विद्यार्थी या स्पर्धेला उपस्थित राहून सहभागी स्पर्धकाचा उत्साह वाढवतील.
९) याकरिता स्थानिक स्तरावर तीन तज्ञ परीक्षक चमूची निवड करावी. त्यांचा निर्णय अंतिम असेल.

## शोधनिबंधाच्या नियम व अटी

१) निबंध लिहितांना १) Title ( शीर्षक) २) Introduction ( प्रस्तावना) ३) Method (पद्धती) ४) Discussion (चर्चा) ५) Orientation (अभिमुख) ६) Analysis tables (विश्लेषण आराखडा) ७) References (संदर्भ सूची) या format मध्ये लिहावा.
या स्वरुपात लिहिलेल्या निबंधाचे उपरोक्त स्वरुपानुरूप गुणांकन करण्यात येईल व पहिल्या तीन स्पर्धकांची निवड करण्यात येईल.
२) या स्पर्धेकरिता कोणत्याही शाखेचा पदवीधर पात्र राहील. ( वयाचे बंधन नाही )
३) विषयाचे विश्लेषण आणि संशोधन करून लिहिलेल्या निबंधाला प्राधान्य देण्यात येईल.
४) बानाईच्या वेबसाईट लिंक https://www.banaengp.com/research-essay-form/ वर (PDF) स्वरूपात अपलोड करावे किंवा पोस्टाने दि. ३१ ऑक्टोंबर २०२३ पर्यंत पाठवावे.
५) सर्वोत्तम २५ शोधनिबंध बानाई द्वारे प्रकाशित करण्यात येतील.
६) या शोधनिबंध स्पर्धेकरिता तीन विषय असून प्रत्येक विषयातील प्राप्त शोध निबंधातून सर्वोत्कृष्ट तीन निबंधाची विषयनिहाय निवड केली जाईल. अशी तीन पारितोषिके विषयनिहाय प्रदान केली जातील.

★ स्पर्धा / परिक्षा नियंत्रक - का. प्रती. इंजि.धम्मानंद मनवर मो. ९७३०००००८४३ इंजि. जोत्सना चव्हाण मो. ९४२३६३४७३३ इंजि. अजय पोहेकर मो. ९४२२५६७६७७, इंजि. पियुश धुळे मो. ९८२३४४१७३४ तसेच इंजि. महेन्द्र राऊत मो.९४२२८२१६२६ इंजि. भास्कर खोब्रागडे मो. ९०२१९२२५३३७ इंजि. शरद घोडके मो. ७००४६५७००१ आहेत संपर्क साधावा.

**विनीत**

इंजि. अरविंद गेडाम
अध्यक्ष
M : 7498564512

इंजि. अजय सावतकर
उपाध्यक्ष
M : 9422508050

इंजि. जयंत इंगळे
सचिव
M : 9423412317

इंजि. धम्मानंद मनवर
सहसचिव
M : 9730000843

इंजि. अनुप सांगोळे
कोषाध्यक्ष
M : 9423686121

इंजि. निलेश नाखले
आंतर तपासणिस
M : 8600047671

इंजि. अजय पोहेकर
सदस्य
M : 9422567677

इंजि. पियुष धुळे
सदस्य
M : 9823441734

इंजि. ज्योत्सना चव्हाण
सदस्य
M : 9423634733